भारतीय विद्या भवन
**सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय**
मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ५८

# संविधान जागृती दिवस, २६ नोव्हेंबर २०२४

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन परिपत्रक क्र. सकिंर्ण/११२४/प्र.क्र.७२/ समन्वय दिनांक २२.११.२०२४ नुसार भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४-२५ या अमृत महोत्सवी वर्षात भारतीय राज्य घटनेबाबत जागरुकता तसेच घटनात्मक अधिकार व कर्तव्याबाबत विदयार्थी व नागरीकामध्ये जागरुकता वाढविण्यासाठी दिनांक २६.११.२०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशीकेचे सामुहीक वाचन करण्याकरीता संस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विदयार्थी दिनांक २६.११.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता महाविदयालयाच्या मुख्य प्रवेशव्दाराजवळ उपस्थित होते. सर्वांनी भारतीय संविधानाच्या उद्देशीकेचे सामुहिक वाचन इंग्रजी आणि मराठीत केले. संस्थेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विदयार्थ्यां मध्ये भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता, घटनात्मक अधिकार व कर्तव्याबाबत जागरूकता निर्माण केली.

(प्रा. मो.मा.मुरुडी)

प्र. प्राचार्य

भारतीय विद्या भवन

# सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय

मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ५८


















भारतीय विद्या भवन

# सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय

मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ५८

४०/2024-25/935 DT:- 26/11/2024

## परिपत्रक

सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांना व विदयार्थ्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन परिपत्रक क्र. सकिंर्ण/११२४/प्र.क्र.७२/ समन्वय दिनांक २२.११.२०२४ नुसार भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४-२५ या अमृत महोत्सवी वर्षात भारतीय राज्य घटनेबाबत जागरुकता तसेच घटनात्मक अधिकार व कर्तव्याबाबत विदयार्थी व नागरीकामध्ये जागरुकता वाढविण्यासाठी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दिनांक २६.११.२०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशीकेचे सामुहीक वाचन करण्याबाबत आयोजन करण्याचे कळविण्यात आलेले आहे.

तरी संस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर व विदयार्थ्यांनी दिनांक २६.११.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता महाविदयालयाच्या मुख्य प्रवेशव्दाराजवळ उपस्थित राहण्याचे करावे.

for प्र. प्राचार्य

**प्रत :** विभाग प्रमुख (स्थापत्य, यंत्र, विद्युत आणि प्रथम वर्ष)/प्र.प्रबंधक/ग्रंथपाल/परीक्षा नियंत्रक/पदव्युत्तर विभाग/प्र.आ.अधिकारी/भा.का.से. (स.प.अ.म.युनिट)

z:\user\२०२४\circular\परिपत्रक- संविधान .docx

# भारताचे संविधान

प्रास्ताविका

आम्ही, भारताचे लोक,
भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य
घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार,
अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे
स्वातंत्र्य; दर्जाची व संधीची समानता;
निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये
व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;
आमच्या संविधानसभेत आज दिनांक सव्वीस
नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे
संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करुन स्वत: प्रत अर्पण करत आहोत.

# THE CONSTITUTION OF INDIA

WE, THE PEOPLE OF INDIA, having solemnly resolved to constitute India into a SOVEREIGN DEMOCRATIC REPUBLIC and to secure to all its citizens:

JUSTICE, social, economic and political;

LIBERTY of thought, expression, belief, faith and worship;

EQUALITY of status and of opportunity;

and to promote among them all

FRATERNITY assuring the dignity of the individual and the unity of the Nation;

IN OUR CONSTITUENT ASSEMBLY this twenty-sixth day of November, 1949, do HEREBY ADOPT, ENACT AND GIVE TO OURSELVES THIS CONSTITUTION.

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण ११२४/प्र.क्र.७२/समन्वय
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २२ नोव्हेंबर, २०२४

वाचा :- सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. बीसीएच-२० प्र.क्र.२४२५९२/ शिक्षण, दिनांक १० ऑक्टोंबर, २०२४

परिपत्रक

दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी आपण संविधान स्वीकृत करुन दिनांक २६ जानेवारी, १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरु झाली. भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४-२५ या अमृत महोत्सवी वर्षात संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ साजरा करण्याबाबतचा निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

भारताच्या संविधानाचे तत्वज्ञान, मूल्य, आदर्श व संविधान निर्मितीचा उद्देश स्पष्ट करण्याकरिता संविधान प्रास्ताविक/उद्देशिकेचे अनन्यसाधारण महत्व आहे. यास्तव भारतीय राज्यघटनेबाबत जागरुकता तसेच घटनात्मक अधिकार व कर्तव्याबाबत विद्यार्थी व नागरिकांमध्ये जागरुकता वाढविण्यासाठी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्याचे आयोजन करण्यात यावे.

१) उच्च व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत सर्व विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, तत्सम शैक्षणिक संस्थामध्ये, सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत दिनांक २६ नाव्हेंबर, २०२४ रोजी सकाळी ११.०० वा. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्याबाबत आयोजन करण्यात यावे.

या उपक्रमाबाबत सर्व विद्यापीठांनी संलग्नित महाविद्यालयांना आवश्यक सूचना द्याव्यात.

२) शासकीय ग्रंथालयातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी/ग्रंथपाल व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये अध्यक्ष/सचिव यांच्या उपस्थितीत वाचक/सभासदांसह भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वरील वेळेत वाचन करावे.

३) सदर उपक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे होईल याबाबत सर्व विद्यापीठे, संचालक, उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण/ कला / ग्रंथालय यांनी आवश्यक दक्षता घ्यावी.

संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ अंतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या अन्य उपक्रमांबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(अ. शा. मुत्याल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१. मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
६. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
७. संचालक, कला संचालनालय, मुंबई
८. संचालक, ग्रंथालय संचालनालय, मुंबई
९. कुलसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त सर्व विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे.
१०. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये (उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त विद्यापीठांचे कुलसचिव यांच्यामार्फत)
११. सर्व सह सचिव/ उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई
१३. निवड नस्ती